प्रेसनोट दिनांक ०३/०५/२०२४

# सोलापूर शहर गुन्हे शाखेकडुन, चोरीचे एकूण ०४ गुन्हे उघड.

---

अ) फिर्यादी नामे- गणेश लक्ष्मण खोत, रा.भैय्या चौक, सोलापूर यांचा विविध कंपनीचे सिगारेट पाकिटे विकण्याचा व्यवसाय आहे. दिनांक १०/०७/२०२३ रोजी, फिर्यादी हे, सिगारेटची पाकिटे विक्री करून, उर्वरीत पाकिटे एका पिशवीमध्ये ठेवून, ती पिशवी मोटार सायकलला अडकावून, फिर्यादी हे एका पान शॉप वाल्याशी बोलत थांबले होते. त्यावेळी, मोटारसायल वरून आलेले दोन अज्ञात इसमांनी, फिर्यादी यांची ३२,८६०/- रू किंमतीचे सिगारेट पाकिटे असलेली पिशवी चोरली होती. त्यावरून, जोडभावी पेठ पोलीस ठाणे गु.र.नं.३४९/२०२३ भा.दं.वि.क. ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

तसेच फिर्यादी नामे- नामदेव भिमराव चव्हाण, रा.वाडी बामणे, जि.उस्मानाबाद हे, मालवाहतूक करणाऱ्या जिप-वाहनावार ड्रायव्हर म्हणून काम करतात. दिनांक १२/०७/२०२३ रोजी, फिर्यादी यांनी, त्यांचे वाहन शिवगंगा मंदीर, सोलापूर येथे पाच मिनिटांकरीता थांबविले होते. त्यावेळी त्या वाहनातुन, विविध कंपनीचे एकूण ७७,८५९/- सिगारेट पाकिटे असलेले एक कार्टुन (बॉक्स) चोरीस गेल्याचे त्यांना समजले. त्यानंतर, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, जोडभावी पेठ पोलीस ठाणे गु.र.नं.३५५/२०२३ भा.दं.वि.क. ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

वरील प्रमाणे दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकास गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीप्रमाणे, **इसम नामे - आकाश भवरसिंह राजपूत उर्फ बंटी, वय-२२ वर्षे, रा.विद्यनगर झोपडपट्टी, रामनगर, पिंपरी चिंचवड यास,** दिनांक ०१/०५/२०२४ रोजी, **सुपा, अहमदनगर जिल्हा** येथून ताब्यात घेतले. नमूद इसमाकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, त्यांने, त्याचा **साथीदार नामे- शंकर ज्ञानेश्वर अडगळे,** रा.आकुर्डी, जि.पुणे याचेसह वरील नमूद दोन्ही सिगारेट चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याने, त्याचे ताब्यातुन, वर नमूद दोन्ही चोरीचे गुन्ह्यातील मिळून एकूण ७०,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे. वरील नमूद आरोपी हा **सिगारेट चोरीचे गुन्हे करण्याचे सवयीचा सराईत गुन्हेगार आहे.**

**ब) त्याचप्रमाणे,** दिनांक ०२/०५/२०२४ रोजी, सपोनि/श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथकास, गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीप्रमाणे **सराईत गुन्हेगार नामे - आदित्य उर्फ पोत्या बसवराज दोडमनी, वय २६ वर्षे, रा. बिलाल नगर, नडगेरी पेट्रोल पंपचे पाठिमागे, विजापूर रोड, सोलापूर** यास ताब्यात घेवून, त्याचेकडून **विजापूर नाका पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.१७२/२०२४** भा.दं.वि.क. ३७९ अन्वये, दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली हिरो होंडा सीडी डॉन कंपनीची ३०,०००/- रू. किंमतीची **मोटार सायकल क्र. MH-13-AE 4013** आणि **मंगळवेढा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण गु.र.नं.५१७/२०१९** भा.दं.वि.क. ३७९ अन्वये, दाखल गुन्ह्यातील गुन्हयातील चोरीस गेलेली पॅशन प्रो कंपनीची ३५,०००/- रू. किंमतीची **मोटार सायकल क्र. MH-13-BN 6593 असे 02 मोटार सायकली जप्त करून, दोन्ही गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

**अशा प्रकारे, वरील नमूद ०२ आरोपींकडून, ०४ चोरीचे गुन्हे उघडकीस येवून, एकूण ०१,३५,०००/- रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे.**

सदरची कामगिरी, मा. श्री.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/वि.शा.), श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि./विजय पाटील, स.पो.नि./श्रीनाथ महाडिक, त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- दिलीप किर्दक, राहुल तोगे, योगेश सावंत, आबाजी सावळे, विठ्ठल यलमार, अजिंक्य माने, धिरज सातपुते, शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, सायबर पोलीस ठाणे कडील अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, सतिश काटे यांनी केली आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करीता.

Scanned with CamScanner